**प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई आणि डॉ. बाळासाहेब सावंत कोंकण कृषि विद्यापीठ, दापोली**
**हवामानावर आधारीत कृषि सल्ला (रत्नागिरी जिल्हा)**
**(०२३५८) २८२३८७**

**अंक ४७/२०१८** **दिनांक १२/०६/२०१८** **कालावधी ५ दिवस**


**डॉ. सुभाष चव्हाण,**
विभाग प्रमुख,
कृषिविद्या विभाग
९४२२४३१०६७

**डॉ. विजय मोरे,**
नोडल ऑफिसर,
कृषिविद्या विभाग
९४२२३७४००१

**प्रा. विरेश चव्हाण,**
तांत्रिक अधिकारी,
कृषिविद्या विभाग
९४२२०६५३४४


| मागील हवामान सारांश दि. ०८/०६/२०१८ ते १२/०६/२०१८ | | |
|---|---|---|
| पाऊस (मिमी) | : | ११८.८ |
| पाऊस (मिमी) १/१/१८ पासून | : | १६६.६ |
| पाऊस (मिमी) (गेल्या वर्षी) | : | ३६३३.५ |
| कमाल तापमान (अं.से) | : | २८.५–३२.० |
| किमान तापमान (अं.से) | : | २३.०–२५.० |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ९३–९८ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ८८–१०० |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | २.४–११.१ |

| हवामान पूर्वानुमान (१३/०६/२०१८ सकाळी ८:३० पासून १७/०६/२०१८ सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| **हवामानांचे घटक** | : | **१३/०६** | **१४/०६** | **१५/०६** | **१६/०६** | **१७/०६** |
| पाऊस (मिमी) | : | ५५ | ६० | ६२ | २० | ५८ |
| कमाल तापमान (अं.से) | : | ३२ | ३२ | ३२ | ३२ | ३१ |
| किमान तापमान (अं.से) | : | २७ | २६ | २६ | २५ | २५ |
| मेघाच्छादन (ऑक्टा) | : | ७ | ७ | ८ | ७ | ६ |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ९३ | ९४ | ९१ | ९१ | ९२ |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (:) | : | ८४ | ८१ | ७९ | ७२ | ७२ |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | : | ०१० | ०१० | ००६ | ००७ | ००९ |
| वाऱ्याची दिशा | : | नै.प. | नै.द. | नै.द. | नै.द. | नै.प. |

## :हवामान पूर्वानुमान कृषि सल्ला:

**दिनांक १३ ते १७ जून, २०१८ पर्यंत पावसाची शक्यता आहे. दिनांक १३ ते १७ जून २०१८ पर्यंत अवकाश मेघाच्छादित राहिल. दिनांक १३ ते १७ जून २०१८ पर्यंत वाऱ्याचा वेग ६ ते १० किमी प्रति तास राहिल.**

| पिक | पिक अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| भात | पुर्वतयारी | • भाताची पेरणी उरकून घ्यावी.<br>• पेरणी करताना बियाण्यास २.५ ग्रॅम प्रति किलो बियाणे या प्रमाणात थायरम हे बुरशीनाशक चोळावे.<br>• जाड दाण्याच्या जातीसाठी हेक्टरी ५० ते ६० कि.ग्रॅम, बारीक दाण्याच्या जातीसाठी हेक्टरी ३५ ते ४० कि. ग्रॅम. आणि संकरित जातीसाठी २० कि. ग्रॅम. बियाणे वापरावे.<br>• पेरणी करताना वाफ्यांना प्रती आर क्षेत्रास १ कि.ग्रॅ. युरिया व ३ कि.ग्रॅ. सिंगल सुपर फॉस्फेट द्यावे.<br>• रोपवाटिकेतील तणांच्या बंदोबस्तासाठी पेरणीनंतर वाफे ओले होताच ऑक्झॅडायारजील (६ ई.सी.) प्रती लिटर पाण्यात ३ मिली या प्रमाणात प्रति गुंठा क्षेत्रावर ५ लिटर या प्रमाणात एक सारखे फवारावे. |
| आंबा, काजू | लागवड | • फळझाडांची लागवड करावयाच्या जागेवर साफ सफाई करून घ्यावी. आंबा लागवडीसाठी १० X १० मीटर (घन लागवडीसाठी ५ X ५ मीटर) आणि चिकू लागवडीसाठी १० X १० मीटर अंतरावर १ X १ X १ मीटर आकाराचे आणि काजूसाठी ७ X ७ मीटर अंतरावर ०.६ X ०.६ X ०.६ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि ३–४ घमेले शेणखत, २ किलो सिंगल सुपर फॉस्फेट आणि वाळवीच्या नियंत्रणासाठी १०० ग्रॅ. फॉलीडॉल पावडर किंवा ५० ग्रॅम दाणेदार क्लोरोफायरीफॉस या मिश्रणाने भरून ठेवावेत.<br>• पावसाच्या सुरूवातीला काजू आणि आंबा झाडांना खोडीकीडीचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असते. यासाठी बागेमध्ये प्रकाश सापळयाचा वापर करून जे किटकनाशक जमा होतील ते किटकनाशक मिश्रीत पाण्यात बुडवून नष्ट करून टाकावेत. तयेच खोडकिडीचा प्रादुर्भाव दिसून आल्यास ज्याठिकाणी प्रादुर्भाव झाला असेल त्याठिकाणची साल १५ मि.मी. पटाशीच्या सहाय्याने काढून खोड किडीला मारून टाकावे. नंतर हा भाग क्लोरोपायरीफॉस (२० टक्के प्रवाही) ५ मि. लि. प्रति लिटर या प्रमाणात द्रावण तयार करून प्रादुर्भित भाग त्या द्रावणाने चांगला भिजवावा. तसेच क्लोरोपायरीफॉस (२० टक्के प्रवाही) १० मि. लि. + ५० मि.ली. रॉकेल खोडकिडीच्या छिद्रामध्ये ओतावे. |
| नारळ/ सुपारी | –– | • नारळावरील गेंडाभुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी बागेमध्ये शेणखताच्या खड्डयात दर दोन महिन्यांनी मिथील पॅरॅथिऑन २ टक्के भुकटी मिसळावी.<br>• नारळावरील सोंडया भुंगा या किडीच्या नियंत्रणासाठी खोडावर १ मिटर उंचीवर गिरमिटाच्या सहाय्याने १५ ते २० सें.मी. खोल तिरपे भोक पाडून त्यामध्ये २० टक्के प्रवाही क्लोरोपायरीफॉस नरसळयाच्या सहाय्याने ओतावे आणि भोक सिमेंटच्या सहाय्याने बंद करावे.<br>• कोळेरोगाच्या यशस्वी नियंत्रणसाठी ०.३ टक्के एलिएट (फॉसिटील एल ८० टके पाण्यात मिसळणारी पावडर ३ ग्रॅम १ लीटर पाण्यात) या बुरशीनाशकाचे द्रावण सुपारी झाडांना मुळावाटे पाच हप्त्यात देण्यात यावे. यासाठी सुपारी झाडाची अन्न घेणारी दोन मुळे निवडून त्याची टोके कापून घ्यावीत. वरील प्रमाणे बुरशीनाशकाचे द्रावण तयार करून प्रत्येकी १०० मि.ली. या प्रमाणात दोन प्लास्टिक पिशव्यात भरून कापलेली मुळे पिशवीत व्यवस्थित बुडवून पिशव्या मुळाला बांधून घ्याव्यात. सदरचे बुरशीनाशक पावसाळा सुरू होण्यापूर्वी द्यावे.<br>• नारळ लागवडीसाठी ७.५ X ७.५ मीटर अंतरावर १ X १ X १ मीटर आकाराचे, आणि सुपारीसाठी २.७ X २.७ मीटर अंतरावर ०.६ X ०.६ X ०.६ मीटर आकाराचे खड्डे खणून ते चांगली माती आणि ३–४ घमेले शेणखत, आणि २ किलो सिंगल सुपर फॉस्फेट या मिश्रणाने भरून ठेवावेत. |
| भाजीपाला आणि फळबाग रोपवाटीका | – | • वेलवर्गीय भाजीपाल्याची लागवड करावी त्यसाठी दोन रांगेतील अंतर १.५ मी. व दोन वेलातील अंतर ९० सें. मी. ठेवावे आणि लागवड करताना प्रत्येक वेलाला २ किलो शेणखत व ५० ते ६० ग्रॅम मिश्रखत (सुफला) मातीत मिसळून दयावे.<br>• भेंडीची लागवड सरी पध्दतीने ६० X ४५ सें.मी. अंतरावर करावी.<br>• रोपवाटीकेतील कलमे आणि रोपाच्या पावसाळी हंगामात पिशव्या भरण्यासाठी पोयटा माती तसेच सेंद्रीय खताची योग्य ती साठवण करावी. |
| दुभती जनावरे/ शेळया/ कुकुटपालन | – | • जनावराना पाणी पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठयामधे हवा खेळती राहिल याची काळजी घ्यावी.<br>• जनावरांना हिरव्या चाऱ्यासाठी झुडूपवर्गीय व बहुवर्षीय वैरणीच्या पिकांची लागवड करावी.<br>• दुभत्या जनावरांना १ ते १.५ किलो खुराक, १५ ते २० किलो हिरवी वैरण व ४ ते ५ किलो वाळलेली वैरणी द्यावी.<br>• सर्वसाधारण एका शेळीस ३–४ किलो हिरवा चारा, २ ते २.५ किलो वाळलेला चारा व ३०० ग्रॅम खुराक प्रतिदिन दयावा.<br>• जनावरांचे येणाऱ्या पावसापासून योग्यते संरक्षण करावे.<br>• ब्रॉयलर पक्षांना पहिले तीन आठवडे त्यांच्या वजनानुसार ब्रॉयलर स्टार्टर व पुढे म्हणजेच चार–सहा आठवडयांपर्यंत ब्रॉयलर फिनीशर खाद्य द्यावे. |
| सुचना | – | • निरनिराळे किडी, रोग जास्त प्रमाणात आढळल्यास नजिकच्या कृषि विद्यापीठाचे केंद्र किंवा महाराष्ट्र शासनाचे कृषि अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. |